असा. क्र. ४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जानेवारी ६, १९९८/पौष १६, शके १९१९**

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.—तापी नदीचे महाराष्ट्र राज्याशी संबंधित पाणी उपयोगात आणण्यासाठी तापी पाटबंधारे विकास महामंडळ स्थापन करुन, तापी नदीच्या खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पांस आणि लाभक्षेत्र विकासास व जलविद्युत ऊर्जा निर्मिती योजनांस चालना देण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आणि पूर नियंत्रणासह इतर संलग्न व आनुषंगिक कामांसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता अधिनियम .. | ४०—६२ |

दिनांक २ जानेवारी १९९८ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ६ जानेवारी, १९९८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**तापी नदीचे महाराष्ट्र राज्याशी संबंधित पाणी उपयोगात आणण्यासाठी तापी पाटबंधारे विकास महामंडळ स्थापन करून, तापी नदीच्या खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पांस आणि लाभक्षेत्र विकासास व जलविद्युत ऊर्जा निर्मिती योजनांस चालना देण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आणि पूर नियंत्रणासह इतर संलग्न व आनुषंगिक कामांसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, तापी नदीचे महाराष्ट्र राज्याशी संबंधित पाणी उपयोगात आणण्यासाठी, तापी पाटबंधारे विकास महामंडळ स्थापन करून, तापी नदीच्या खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पांस आणि लाभक्षेत्र विकासास आणि जलविद्युत ऊर्जा निर्मिती योजनांस चालना देण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आणि पूर नियंत्रणासह इतर संलग्न व आनुषंगिक कामांना चालना देण्यासाठी विशेष तरतुदी करणे इष्ट होते;

आणि ज्याअर्थी, त्यासाठी त्वरित कायदा करणे आवश्यक होते असे वाटले;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांसाठी, कायदा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, दिनांक ४ डिसेंबर १९९७ रोजी महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अध्यादेश, १९९७ हा प्रख्यापित केला होता; १९९७ चा महा. अध्या. १८.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक
## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ असे म्हणावे.

(२) तो, महाराष्ट्र राज्याच्या तापी नदीच्या मुख्य प्रवाहास आणि राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य क्षेत्रामध्ये किंवा क्षेत्रांमध्ये लागू असेल.

(३) तो दिनांक ४ डिसेंबर १९९७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "महामंडळाचे कार्यक्षेत्र" म्हणजे तापी नदीच्या मुख्य प्रवाहाचे क्षेत्र आणि राज्य शासनाकडून कलम १ च्या पोट-कलम (२) अन्वये राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी लागू करण्यात येतील असे कोणतेही क्षेत्र किंवा क्षेत्रे;

(ब) "महामंडळ" म्हणजे कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले तापी पाटबंधारे विकास महामंडळ;

(क) "जलविद्युत ऊर्जा प्रकल्प" म्हणजे महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील जलविद्युत ऊर्जा प्रकल्प आणि त्यात अशा प्रकल्पांचे नियोजन, बांधकाम, परिरक्षण व व्यवस्थापन यांचा समावेश असेल आणि तसेच राज्य शासनाकडून महामंडळाकडे सोपविण्यात आलेल्या, स्वाधीन करण्यात आलेल्या किंवा हस्तांतरित करण्यात आलेल्या जलविद्युत ऊर्जा प्रकल्पांचासुद्धा त्यात समावेश असेल;

(ड) "पाटबंधारे विभाग" म्हणजे शासनाचा पाटबंधारे विभाग;

(ई) "पाटबंधारे प्रकल्प" म्हणजे,—

(एक) १०,००० हेक्टरपेक्षा अधिक सिंचनक्षम लाभक्षेत्र असणारा मोठा पाटबंधारे प्रकल्प,

(दोन) २,००० हेक्टरपेक्षा अधिक आणि १०,००० हेक्टरपर्यंत सिंचनक्षम लाभक्षेत्र असणारा मध्यम पाटबंधारे प्रकल्प,

(तीन) २५० हेक्टरपेक्षा अधिक आणि २,००० हेक्टरपर्यंत सिंचनक्षम लाभक्षेत्र असणारा लहान पाटबंधारे प्रकल्प,

यांचे नियोजन, बांधकाम, परिरक्षण व व्यवस्थापन आणि त्यामध्ये लाभक्षेत्र विकास, पूरनियंत्रण आणि इतर संलग्न कार्याचा समावेश असेल ;

(फ) "तापी नदीचा मुख्य प्रवाह" म्हणजे तापी नदीचे भौगोलिक क्षेत्र आणि महाराष्ट्र राज्यातील तापीच्या सर्व उपनद्या ;

(ग) "सदस्य" म्हणजे, संचालक म्हणून पदनिर्देशित केलेला महामंडळाचा सदस्य ;

(ह) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले ;

(आय) "विनियम" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेले विनियम ;

(जे) "राज्य शासन" किंवा "शासन" म्हणजे, महाराष्ट्र शासन.

## प्रकरण दोन

### महामंडळाची स्थापना, कामकाज चालविणे व कर्मचारीवर्ग

**तापी पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना.**

३. (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी तापी पाटबंधारे विकास महामंडळ या नावाने संबोधण्यात यावयाच्या महामंडळाची स्थापना करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले महामंडळ हे, एक निगमनिकाय असेल आणि त्याची अखंड परंपरा असेल व त्याचा एक सामाईक शिक्का असेल, त्यास या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी करार करण्याचा, स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा व ती निकालात काढण्याचा आणि आवश्यक अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्या निगम नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा लावता येईल.

(३) महामंडळाचे मुख्यालय जळगाव येथे असेल.

**महामंडळाची रचना.**

४. (१) महामंडळामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

| | |
|---|---|
| (अ) पाटबंधारे मंत्री .. .. .. | पदसिद्ध अध्यक्ष ; |
| (ब) शासनाने नामनिर्देशित केलेला खानदेशातील एक अशासकीय सदस्य .. .. .. | उपाध्यक्ष ; |
| (क) शासनाचा मुख्य सचिव .. .. .. | पदसिद्ध उपाध्यक्ष ; |
| (ड) शासन सचिव, पाटबंधारे विभाग .. .. | पदसिद्ध व्यवस्थापकीय संचालक ; |
| (ई) शासन सचिव, पाटबंधारे विभाग (लाभक्षेत्र विकास) .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (फ) शासन सचिव, वित्त विभाग .. .. .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ग) शासन सचिव, नियोजन विभाग .. .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ह) शासन सचिव, महसूल व वन विभाग (वने) .. .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (आय) शासन सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (जे) शासन सचिव, कृषि विभाग .. .. | पदसिद्ध सदस्य ; |

(के) महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांमधून धुळे, नाशिक व जळगाव जिल्ह्यांतील मतदार संघातील निर्वाचित सदस्यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य ;

(ल) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांमधून धुळे, नाशिक व जळगांव जिल्ह्यांतील राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य ;

(म) शासनाच्या सचिवापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागातील अभियांत्रिकी सेवेच्या संवर्गातील, एका अधिकाऱ्याची राज्य शासनाकडून महामंडळाचा सदस्य-सचिव म्हणून नियुक्ती करण्यात येईल आणि त्यास महामंडळाचा कार्यकारी संचालक म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल. कार्यकारी संचालकाला महामंडळाच्या सर्व बैठकांच्या चर्चेमध्ये व कार्यवाहीमध्ये भाग घेता येईल मात्र त्याला मत देण्याचा अधिकार नसेल.

(२) शासनाने तत्पूर्वी समाप्त केला नाही तर, नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी एक वर्षाचा असेल :

परंतु असे की, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य, जर महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य म्हणून असण्याचे बंद झाले तर ते महामंडळाचे सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल.

(३) पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेल्या महामंडळाच्या अशासकीय सदस्यांना विनियमांद्वारे घालून देण्यात येईल असे पारिश्रमिक व भत्ते मिळतील.

(४) महामंडळाच्या शासकीय सदस्यांना बैठकीला हजर राहण्यासाठी वैयक्तिक खर्च भागविण्याकरिता विनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे पूरक भत्ते मिळतील.

कार्यकारी समिती.

५. (१) महामंडळाची पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक कार्यकारी समिती असेल :—

| | | |
|---|---|---|
| (अ) | महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक .. .. | अध्यक्ष. |
| (ब) | महामंडळाचा कार्यकारी संचालक .. .. .. | सदस्य. |
| (क) | मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक | सदस्य. |
| (ड) | महामंडळाचा मुख्य अभियंता .. .. .. | सदस्य. |
| (ई) | महामंडळाचा मुख्य लेखा व वित्त अधिकारी .. .. | सदस्य. |
| (फ) | महामंडळाचा कार्यकारी अभियंता .. .. .. | सदस्य-सचिव. |

(२) कार्यकारी समितीचे अधिकार, कार्ये आणि कर्तव्ये ही विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी असतील.

सदस्यत्व निरर्ह करणे व सदस्यांना काढून टाकणे.

६. (१) जर एखादी व्यक्ती,—

(अ) महामंडळाची कर्मचारी असेल, संचालक सोडून ;

(ब) विकल मनाची असून एखाद्या सक्षम न्यायालयाकडून ती तसे असल्याचे जाहीर करण्यात आले असेल ;

(क) अमुक्त नादार असेल ;

(ड) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आली असेल ;

(ई) स्वतः किंवा कोणताही भागीदार, मालक किंवा कर्मचारी यांच्यामार्फत महामंडळाबरोबर, महामंडळाद्वारे किंवा महामंडळातर्फे केलेल्या कोणत्याही करारात किंवा कामात पैशाच्या किंवा इतर कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हिस्साधारक किंवा हितसंबंधित असेल ;

(फ) महामंडळाबरोबर, महामंडळाद्वारे किंवा महामंडळातर्फे केलेल्या कोणत्याही करारात किंवा कामात कोणत्याही प्रकारचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही कंपनीचा संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा इतर अधिकारी असेल,

तर ती व्यक्ती, अशासकीय सदस्य म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास किंवा असा सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरेल :

परंतु, एखादी व्यक्ती,—

(एक) स्थावर मालमत्तेची कोणतीही विक्री, खरेदी, भाडेपट्टा किंवा अदलाबदल किंवा त्यासाठी केलेला कोणताही करारनामा ;

(दोन) पैशासाठी केलेला कर्जाचा करारनामा किंवा केवळ पैसे देण्यासंबंधीची कोणतीही प्रतिभूती ;

(तीन) महामंडळाच्या कारभारासंबंधीची कोणतीही जाहिरात ज्या कोणत्याही वृत्तपत्रात प्रसिद्ध होत असेल असे वृत्तपत्र,

यामध्ये तिचा किंवा ती व्यक्ती ज्या कंपनीचा संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा अन्य अधिकारी आहे त्या कंपनीचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे याच कारणावरून केवळ खंड (ई) किंवा खंड (फ) अन्वये अनर्ह ठरणार नाही.

(२) राज्य शासनाच्या मते,—

(अ) ज्यास पोट-कलम (१) अन्वये अपात्र ठरविण्यात आले असेल ;

(ब) जो काम करण्यास नकार देईल ;

(क) ज्याने, त्याचे महामंडळावर पुढे चालू राहणे जनतेच्या हिताच्या दृष्टीने हानिकारक ठरेल अशा प्रकारे सदस्य म्हणून असलेल्या आपल्या पदाचा दुरुपयोग केलेला असेल ; किंवा

(ड) अन्यथा तो सदस्य म्हणून राहण्यास अपात्र झाला असेल,

अशा शासनाकडून नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही सदस्याला शासन महामंडळातून काढून टाकू शकेल.

(३) पोट-कलम (२) खालील सदस्याला काढून टाकण्यासंबंधीचा कोणताही आदेश, अशासकीय सदस्याला त्याचे स्पष्टीकरण शासनाला सादर करण्याची संधी देण्यात आल्याखेरीज काढण्यात येणार नाही आणि असा आदेश काढण्यात आलेला असेल त्याबाबतीत अशा प्रकारे काढून टाकलेल्या सदस्याचे पद रिक्त असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये अशा प्रकारे ज्या सदस्याला काढून टाकण्यात आलेले असेल तो सदस्य महामंडळाचा सदस्य म्हणून किंवा अन्य कोणत्याही नात्याने फेरनियुक्तीस पात्र ठरणार नाही.

७. (१) अध्यक्ष ठरवील अशा वेळी आणि अशा ठिकाणी महामंडळ, बैठक भरवील आणि पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, त्या बैठकीत कामकाज पार पाडताना (गणपूर्ती धरून) विनियमांद्वारे घालून देण्यात येईल अशा कार्यनियमावलीचे पालन करण्यात येईल : महामंडळाच्या बैठकी.

परंतु, प्रत्येक कॅलेंडर महिन्यात किमान एकदा अशा रीतीने बैठक घेण्यात येईल की, दोन बैठकींमधील कालावधी तीस दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.

(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये नेमलेला उपाध्यक्ष, महामंडळाच्या प्रत्येक बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील ; परंतु, उक्त खंड (ब) अन्वये नेमलेला उपाध्यक्ष हा जर राज्य विधानमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य व्यक्ती असेल तर पदसिद्ध उपाध्यक्ष असलेला मुख्य सचिव हा, अशा बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहील. कोणत्याही कारणाने कोणत्याही बैठकीत अध्यक्ष व उपाध्यक्ष उपस्थित राहू शकले नाही तर, ती बैठक तहकूब केली जाईल.

(३) महामंडळाने किंवा त्याच्या वतीने केलेला किंवा करावयाचे प्रस्तावित केलेला कोणताही करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यांच्याशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित किंवा हित-संबंधित असलेला एखादा सदस्य, संधी मिळताच त्वरित त्याच्या हितसंबंधाचे स्वरूप महामंडळास विशद करील आणि महामंडळाच्या कोणत्याही बैठकीत, ज्यावेळी असा करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यावर चर्चा होईल तेव्हा, माहिती मिळविण्यासाठी इतर सदस्यांना त्याची उपस्थिती आवश्यक वाटल्याशिवाय उपस्थित राहणार नाही. परंतु, अशा प्रकारे उपस्थित राहण्यास सांगण्यात आलेला असा कोणताही सदस्य अशा कोणताही करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यावर मतदान करणार नाही :

परंतु, अशा कोणत्याही कराराशी, कर्जाशी, व्यवस्थेशी किंवा प्रस्तावाशी संबंधित अशा कंपनीचा केवळ भागधारक असल्याच्या कारणावरूनच एखाद्या सदस्याचा वर निर्देश केल्याप्रमाणे संबंध वा हितसंबंध असल्याचे मानले जाणार नाही.

८. महामंडळ, वेळोवेळी त्याच्या सदस्यांमधून त्यास योग्य वाटेल एवढ्या सदस्यांची मिळून एक समिती किंवा समित्या स्थापन करू शकेल आणि अशा समितीकडे किंवा समित्यांकडे या अधि-नियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे अधिकार सोपवू शकेल. समित्यांची स्थापना.

शासनाचे आणि स्थानिक प्राधिकरणाचे अधिकारी इत्यादींना बोलावण्या-संबंधी तरतूद.

९. (१) महामंडळास किंवा त्याच्या कोणत्याही समितीस कोणत्याही बाबीच्या किंवा बाबींच्या संबंधात सहाय्य करण्यास किंवा सल्ला देण्यास विशेष निमंत्रित म्हणून त्याच्या बैठकीत किंवा बैठकींना उपस्थित राहण्यासाठी केंद्र सरकारच्या, राज्य शासनाच्या, स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा कोणत्याही संघटनेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही व्यक्तीस, बोलावता येईल. अशा निमंत्रित अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस कामकाजात भाग घेता येईल ; मात्र त्याला मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(२) अशा निमंत्रित केलेल्या अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस, महामंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी होणारा वैयक्तिक खर्च भागविता यावा म्हणून, महामंडळ वेळोवेळी ठरविल असे मानधन किंवा पूरक भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

सदस्याचे नैमित्तिक रिक्त पदे भरणे.

१०. महामंडळाच्या सदस्याचे कोणतेही रिक्त पद, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, जणू ही नियुक्ती प्रथमतः करण्यात येत आहे असे समजून त्याच रीतीने भरण्यात येईल.

पद रिक्त असणे, अनौपचारिकता असणे इत्यादींमुळे कृती विधिअग्राह्य न ठरणे.

११. या अधिनियमानुसार महामंडळाने किंवा महामंडळाने नियुक्त केलेल्या कोणत्याही समितीने केलेले कोणतेही कृत्य किंवा हाती घेतलेली कार्यवाही ही केवळ,—

(अ) कोणत्याही सदस्याचे पद रिक्त आहे किंवा महामंडळाच्या किंवा महामंडळाच्या समितीच्या स्थापनेमध्ये किंवा पुनर्स्थापनेमध्ये कोणताही दोष आहे ; किंवा

(ब) एखाद्या व्यक्तीची, महामंडळाची किंवा त्याच्या समितीची सदस्य म्हणून नियुक्ती होण्यामध्ये दोष अथवा अनियमितता आहे ; किंवा

(क) मूळ विषयावर परिणाम न करणारा असा कोणताही दोष अथवा अनियमितता अशा कोणत्याही कृतीमध्ये किंवा कार्यवाहीमध्ये आहे,

या कारणास्तव, विधिअग्राह्य ठरणार नाही.

महामंडळाचे अधिकारी व कमचारी.

१२. (१) राज्य शासन महामंडळासाठी कलम ४ मधील पोट-कलम (१) मध्ये तरतुद केलेल्या रीतीने कार्यकारी संचालकाची, मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेमधून संचालकापेक्षा कमी दर्जा नसलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची नियुक्ती करील.

(२) महामंडळास आपली कर्तव्ये व कामे कार्यक्षमरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील असे पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यांना दुय्यम असे इतर अधिकारी व कर्मचारी यांची शासनाच्या पूर्वमंजुरीने नियुक्ती करता येईल.

(३) अधिकारी व सेवक यांच्या नियुक्तीच्या व सेवेच्या शर्ती व त्यांचे वेतनमान,—

(अ) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यांच्या संबंधात विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल, आणि

(ब) पोट-कलम (२) मध्ये उल्लेखिलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या संबंधात, विनियमांद्वारे वेळोवेळी नेमून देण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) महामंडळाच्या अधीक्षणाच्या अधीन राहून, कार्यकारी संचालक, महामंडळावर प्रतिनियुक्तीवर नेमणूक केलेल्या शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांसह त्याच्या सर्व अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवील.

**सर्व अधिकारी व कर्मचारी-वर्गाची अनर्हता.**

१३. महामंडळाद्वारे किंवा महामंडळाच्या वतीने, केलेल्या कोणत्याही करारात किंवा महामंडळा-खालील किंवा महामंडळाद्वारे किंवा महामंडळाच्या वतीने दिलेल्या कोणत्याही नोकरीत जिचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे स्वतःचा किंवा तिच्या भागीदाराद्वारे, किंवा अभिकर्त्याद्वारे, त्याचा अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून असेल त्या व्यतिरिक्त अन्य प्रकारे कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशी कोणतीही व्यक्ती महामंडळाचा अधिकारी किंवा कर्मचारी होणार नाही किंवा राहणार नाही.

**महामंडळाचे आदेश, इत्यादींचे अधिप्रमाणन.**

१४. महामंडळाचे सर्व कामकाज अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येईल आणि महामंडळाचे सर्व आदेश आणि लेख, महामंडळाच्या कार्यकारी संचालकांच्या किंवा यासंबंधात विनियमांद्वारे प्राधिकृत करण्यात येईल अशा कोणत्याही इतर अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येतील.

## प्रकरण तीन

### मालमत्ता, मत्ता, दायित्वे व बंधने निहित असणे आणि कर्मचाऱ्यांच्या बदलीने नियुक्त्या

**महामंडळाकडे मालमत्ता निहित करणे व हस्तांतरित करणे.**

१५. (१) राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "नेमून दिलेला दिनांक" असा करण्यात आला आहे),——

(अ) नेमून दिलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी पाटबंधारे विभागाच्या नियंत्रणाखाली आणि राज्य शासनाकडे निहित होत्या अशा महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील, स्थावर व जंगम मालमत्तांचा आणि मत्तांचा समावेश असलेल्या म्हणजेच त्या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात आलेले सर्व पाटबंधारे प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प, बांधकाम चालू असलेली कामे, पूर्ण झालेल्या योजनांचे व्यवस्थापन यांचा समावेश असलेल्या मालमत्ता व मत्ता महामंडळाकडे निहित होतील आणि त्याकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या असतील आणि त्या बाबतीत मिळालेले सर्व उत्पन्न आणि केलेला खर्च हा महामंडळाच्या लेख्यावर आणण्यात येईल, आणि

(ब) उक्त प्रकल्पासंबंधीतील राज्य शासनाचे हक्क, दायित्वे व बंधने ही-मग ती कोणत्याही करारामुळे उद्भवलेली असोत किंवा अन्य प्रकारे संबंधित असोत——महामंडळाचे हक्क, दायित्वे व बंधने असतील.

(२) अशी मालमत्ता, मत्ता, हक्क, दायित्वे व बंधने यांचे मूल्यमापन राज्य शासन ठरविल अशा रीतीने करण्यात येईल.

(३) नेमून दिलेल्या दिनांकापूर्वी राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनाविरुद्ध दाखल करण्यात आलेले किंवा दाखल करण्यात यावयाचे किंवा बचाव करण्यात आलेले, महामंडळाकडे पोट-कलम (१) अन्वये निहित झालेल्या पाटबंधारे प्रकल्पांच्या आणि जलविद्युत प्रकल्पांच्या विकासाच्या कोणत्याही योजनासंबंधीतील सर्व दावे व इतर कायदेशीर कार्यवाही महामंडळाकडून किंवा महामंडळाविरुद्ध चालू ठेवता येईल किंवा दाखल करता येईल किंवा महामंडळाकडून तिचा बचाव करता येईल.

**मालमत्ता निहित करण्याचा राज्य शासनाचा निर्णय अंतिम असणे.**

१६. कोणतीही मालमत्ता किंवा मत्ता कलम १५ अन्वये महामंडळाकडे निहित झालेली आहे किंवा कसे किंवा कोणतेही हक्क, दायित्वे किंवा बंधने ही त्या कलमान्वये महामंडळाचे हक्क, दायित्वे किंवा बंधने झालेली आहेत किंवा कसे अशी कोणतीही शंका अथवा विवाद उद्भवेल त्याबाबतीत अशी शंका अथवा विवाद राज्य शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल आणि राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

विवक्षित शासकीय कर्मचाऱ्यास महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यासंबंधीचा राज्य शासनाचा अधिकार.

१७. (१) ज्या बाबतीत या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कोणतेही अधिकार, कर्तव्य आणि कामे महामंडळाकडे सोपवण्याच्या परिणामी, राज्य शासनाच्या मते राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस, महामंडळाच्या कार्यक्षेत्रामधील राज्य क्षेत्रातील पाटबंधारे प्रकल्प, उपसा सिंचन योजना आणि जलविद्युत प्रकल्प यांचे नियोजन, अन्वेषण, संकल्पचित्रण, बांधकाम, व्यवस्थापन आणि भूविकास या क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या शासनाच्या पाटबंधारे विभागातील सर्व क्षेत्रीय आस्थापना म्हणजेच तांत्रिक कर्मचारी वर्गातील अधिकारी व कर्मचारी तसेच, लिपिकवर्गीय व लिपिकवर्गेतर कर्मचारी (स्थायी नियमित, अस्थायी नियमित, स्थायी, अस्थायी म्हणून रूपांतरित आणि रोजंदारीवरील) हे राज्य शासनाच्या आवश्यकतेपेक्षा संपूर्णपणे किंवा अंशतः अतिरिक्त झालेले असतील किंवा होण्याची शक्यता असेल त्याबाबतीत किंवा महामंडळास कार्यक्षमपणे आपले अधिकार वापरता यावेत, आपली कर्तव्ये आणि कामे पार पाडता यावीत यासाठी त्यास अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवा आवश्यक असतील त्याबाबतीत राज्य शासनास, राज्य शासनाच्या विभागाच्या प्रमुखास किंवा राज्य शासनाकडून त्या बाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास त्यासंबंधातील गरजा लक्षात घेऊन वेळोवेळी, आदेशाद्वारे अशा अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविता येईल आणि महामंडळ या कलमाच्या तरतुदीस अधीन राहून त्यांना स्वीकार करील व त्यांना प्रतिनियुक्तीवर ठेवील.

(२) कोणत्याही अशा कर्मचाऱ्याचा महामंडळाकडील प्रतिनियुक्तीचा कालावधी हा, कोणत्याही अशा व्यक्तीस, पदोन्नती, पदावनती, सेवासमाप्ती किंवा नियत सेवावधी यांसारख्या कारणामुळे किंवा राज्य शासनाकडून निदेश देण्यात येईल अशा कोणत्याही अन्य कारणांमुळे प्रत्यावर्तीत करणे आवश्यक असेल त्या खेरीज करून, इतर बाबतीत पाच वर्षांचा असेल. प्रतिनियुक्तीचा कालावधी समाप्त झाल्यानंतर तो राज्य शासनाच्या सेवेत प्रत्यावर्तीत झालेला असेल :

परंतु, अशा प्रतिनियुक्तीच्या कालावधीमध्ये उक्त कर्मचारीवर्गातील सदस्यांचे वेतन, रजा, सेवानिवृत्ती, भत्ते, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी यासंबंधातील सर्व बाबींचे आणि इतर सेवाशर्तींचे महाराष्ट्र नागरी सेवा नियमांद्वारे किंवा राज्य शासनाकडून वेळोवेळी तयार करण्यात येतील अशा इतर नियमांद्वारे विनियमन करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर बदली करण्यात आलेल्या उक्त आस्थापनेच्या सर्व नियमित, स्थायी आणि नियमित तात्पुरत्या स्थायी कर्मचाऱ्यांना, राज्य शासनाच्या सेवेतील त्यांच्या पदांवर धारणाधिकार असेल आणि महामंडळाखालील त्यांचा सेवेचा कालावधी ते राज्य शासनाच्या सेवेत परत आल्यानंतर त्यांच्या वेतनवाढी, निवृत्तिवेतने व त्यांच्या सेवेसंबंधातील इतर बाबी यांसाठी हिशेबात घेण्यात येईल.

(४) महामंडळाला महामंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची बदली करण्याचा प्राधिकार असेल.

(५) महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास कोणताही प्रतिनियुक्ती भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही.

(६) महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते महामंडळाच्या निधीतून देण्यात येतील.

(७) या कलमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त अन्य बाबतीत महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी त्यास लागू असलेल्या अटी व शर्तींपेक्षा कमी लाभदायक असणार नाहीत आणि राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने असेल त्या व्यतिरिक्त त्यात त्यांचे अहित होईल अशा प्रकारे फेरबदल करण्यात येणार नाही.

## प्रकरण चार

## महामंडळाची कामे आणि अधिकार

महामंडळाची कामे.

१८. महामंडळाची कामे पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) पुढील बाबींना चालना देणे आणि त्या कार्यान्वित करणे,—

(एक) पाटबंधारे प्रकल्प आणि लाभक्षेत्र विकास-पूर नियंत्रणासह ; आणि
(दोन) जल विद्युत ऊर्जा निर्मितीच्या योजना ;

(ब) ७५ टक्के विश्वासार्हतेने येणारे ३२६.२६ टीएमसी पाण्याचा वापर व्हावा इतपत पाटबंधारे प्रकल्पांच्या व त्यांच्या लाभक्षेत्र विकासाच्या योजनांची आखणी, अन्वेषण, संकल्पचित्रण, बांधकाम आणि व्यवस्था ;

(क) जल विद्युत ऊर्जा निर्मितीच्या योजना आखणे, त्यांचे अन्वेषण, संकल्पचित्रण, बांधकाम आणि व्यवस्था ;

(ड) या अधिनियमान्वये मत्ता व दायित्वे यांसह महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आलेली कामे आणि कोणत्याही अन्य बाबी यांच्या संबंधात करार करणे ;

(ई) निविदा, बोली, देकार मागवणे आणि महामंडळाच्या सर्व कामांच्या प्रयोजनांसाठी करार करणे ;

(फ) पूर नियंत्रण व लाभक्षेत्र विकास आणि जल विद्युत प्रकल्प यांसह पाटबंधारे प्रकल्पांच्या योजनांची आखणी, अन्वेषण, संकल्पचित्रण, बांधकाम आणि व्यवस्थापन यांमध्ये कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तीगटाच्या किंवा संघटनेच्या-ती विधिसंस्थापित असो किंवा नसो-सहभागास उत्तेजन देणे ;

(ग) महामंडळ ज्यासाठी स्थापन झाले असेल ती प्रयोजने साध्य करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित सर्व बाबींसाठी संयुक्तपणे अन्य निगमनिकाय किंवा संस्था यांच्याबरोबर किंवा शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याबरोबर किंवा एजन्सी तत्त्वावर योजना किंवा कामे हाती घेणे ;

(ह) मत्स्यव्यवसाय, मत्स्यसंवर्धन, पुष्पसंवर्धन, फलोत्पादन, रेशीम उत्पादन, ऊतिसंवर्धन इत्यादींसारख्या पाटबंधाऱ्यांशी संबंधित कामांना चालना देणे ;

(आय) पाटबंधारे आणि जल विद्युत प्रकल्पांच्या ठिकाणी व परिसरात पर्यटन, जलक्रीडा किंवा अन्य संबंधित उपक्रम यांना चालना देणे ;

(जे) तलावासभोवतीच्या व तलावाजवळील आणि इतर योग्य ठिकाणांमधील जमीन पाटबंधारेविषयक सुविधा व इतर पायाभूत सुविधांसह विकसित करणे आणि स्वारस्य असलेल्या व्यक्तींना अशा विकसित मालमत्ता अंशतः किंवा पूर्णतः भाडेपट्ट्याने देणे ;

(के) वार्षिक योजना आणि पंचवार्षिक कार्यकारी विकास योजना तयार करणे ;

(ल) वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे ;

(म) महामंडळाने निर्धारित केलेल्या अटींवर व शर्तींवर, प्रत्येकी २५० हेक्टरपेक्षा जास्त जलसिंचन लाभक्षेत्र असणाऱ्या-या अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिदिष्ट केलेल्या-जळगाव जिल्ह्यातील (संख्या २१) आणि धुळे जिल्ह्यातील (संख्या ३५) विद्यमान सहकारी उपसा सिंचन योजना त्यांच्या मत्ता व दायित्वे यांसह चालवण्यासाठी व देखभालीसाठी ताब्यात घेणे आणि महामंडळाने केलेल्या खर्चाची संपूर्ण रक्कम मिळाल्यावर सहकारी उपसा सिंचन संस्थांकडे परत सोपवणे ;

(न) महामंडळ ज्याच्यासाठी स्थापन झाले आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्य शासनाने सोपविलेली कोणतीही इतर कामे हाती घेणे.

महामंडळाचे सर्वसाधारण अधिकार.

१९. (१) महामंडळाला सर्व निविदांच्या संबंधात प्रशासनिक मान्यता, सुधारित प्रशासनिक मान्यता, तांत्रिक मंजुरी देण्याचा व स्वीकृती देण्याचा, अर्थसंकल्पाला मंजुरी देण्याचा व वित्तीय तरतुदी करण्याचा, करारातून उद्भवलेल्या विवादांच्या बाबतीत समझोता करण्याचा आणि या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक किंवा इष्ट असतील अशा कोणत्याही अन्य गोष्टी करण्याचा अधिकार असेल.

(२) पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा अधिकारांमध्ये, खालील अधिकारांचा समावेश असेल :—

(अ) महामंडळास त्याच्या कामांपैकी कोणतीही कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटेल अशी जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करणे व धारण करणे आणि त्याने धारण केलेली कोणतीही मालमत्ता महामंडळास योग्य वाटेल अशा अटींवर भाडेपट्टयाने देणे, विकणे, तिची देवाण-घेवाण करणे किंवा अन्य प्रकारे तिचे हस्तांतरण करणे ;

(ब) बांधावयाची किंवा बांधकाम करून घेण्याचे योजलेली धरणे, बंधारे, जलाशय, विद्युत-गृहे, विद्युतसंरचना, विद्युत पारेषण तारमार्ग आणि उपकेंद्रे, नौकानयनाची बांधकामे, पाटबंधारे, पूर नियंत्रण आणि जलनिःसारणाचे नाले बांधणे आणि अशा प्रकारची आवश्यक असतील अशी इतर बांधकामे व संरचना करणे ;

(क) त्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पाण्याच्या प्रदूषणास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे आणि पाणीपुरवठा, पाटबंधारे, सार्वजनिक आरोग्य किंवा मत्स्यजीवन यांसाठी हानीकारक असलेली अशी पाण्यात वाहून जाऊ शकणारी विसर्जिते सोडण्यास प्रतिबंध करण्यासाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना करणे ;

(ड) जलाशयांमध्ये किंवा जल प्रवाहांमध्ये माशांचा साठा करणे आणि मासे किंवा मच्छीमारीसंबंधी हक्क विकणे आणि त्याच्या नियंत्रणाखालील पाण्यातून मासे काढण्यास मनाई करणे ;

(ई) महामंडळाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा चांगल्या प्रकारे वापर करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अनुसार जलउपयोजक संघ आणि अन्य संघटना यांच्या स्थापनेसाठी सहाय्य करणे ; १९६१ चा महा. २४.

(फ) जलक्रीडेचे व जलाशय आणि त्याचा परिसर यांचा वापर करून करावयाच्या इतर मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे हक्क भाड्याने देणे ;

(ग) (एक) तापी नदी खोऱ्याच्या विकासाकरिता जास्तीतजास्त काटकसरीने पाणी, विद्युत ऊर्जा आणि इतर साधन संपत्तीच्या उपयोगासाठी ;

(दोन) तापी नदी आणि तिच्या उपनद्या यांच्या प्रवाहाच्या स्थितीवर प्रयोगाचे होणारे परिणाम निश्चित करण्यासाठी ;

(तीन) तापी नदी आणि तिच्या उपनद्यांमध्ये नौकानयनाची सोय पुरवण्यासाठी, प्रयोग व संशोधन करण्याकरिता प्रयोगशाळा, प्रायोगिक व संशोधन केंद्रे आणि कृषिक्षेत्रे यांची स्थापना करणे, त्यांची देखभाल करणे व ते कार्यान्वित करणे ; १९७६ चा महा. ३८.

(ह) महामंडळाला आपली कामे पार पाडण्यास सहाय्य करण्यासाठी योग्य संमंत्रकाची किंवा विशेष ज्ञान किंवा कौशल्य असणाऱ्या व्यक्तीची नेमणूक करणे ;

(आय) ज्याकरिता महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे अशा उद्दिष्टांना चालना देण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही बाबींकरिता आवश्यक किंवा आनुषंगिक किंवा हितावह इतर गोष्टी करणे व अशी सर्व कामे पार पाडणे.

जलसिंचनार्थ औद्योगिक व घरगुती प्रयोजनार्थ पुरवलेल्या पाण्यासाठी पाणीपट्टी.

२०. राज्य शासन, स्थानिक प्राधिकरणे, शासकीय अभिकरणे, लाभधारक व पाणी वापरणाऱ्यांचे संघ यांना जलसिंचनासाठी औद्योगिक व घरगुती प्रयोजनासाठी करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यावरील पाणीपट्टीचे दर महामंडळ वेळोवेळी ठरवील आणि बसवील :

परंतु, पाणीपट्टीसाठी आकारावयाचे दर असे असतील की, अशा प्रकारे वसूल केलेली पाणीपट्टी महामंडळाने खुल्या बाजारातून उभारलेल्या कर्जावरील निदान व्याज देण्यास पुरेशी होईल.

२१. महामंडळ, पाणीपट्टी वसूल करून कर्जाऊ रकमेवरील व्याज देईल.

कर्जाऊ घेतलेल्या रकमेवर व्याज देण्याची महामंडळाची जबाबदारी.

२२. कोणतीही व्यक्ती महामंडळाची पूर्वमान्यता घेतल्याखेरीज महामंडळाच्या कार्यक्षेत्रात कोणतेही धरण, बंधारा किंवा बांध किंवा इतर बांधकाम किंवा भूपृष्ठ जल काढून घेण्याकरिता कोणत्याही यंत्रणेची उभारणी करणार नाही :

परंतु, राज्य शासन किंवा एखादे स्थानिक प्राधिकरण अशा कार्यान्वियनाच्या क्षेत्रात कोणत्याही ठिकाणी किंवा कोणत्याही नदीवर असे धरण, बांध, बंधारा इत्यादी बांधू शकेल, कार्यान्वित करू शकेल किंवा असे धरण, बंधारा, बांध महामंडळाकडे नेमून देऊ शकेल किंवा सुपूर्द करू शकेल.

महामंडळाच्या मान्यतेशिवाय, धरण, बंधारा, बांध इत्यादींचे बांधकाम करण्यास प्रतिबंध.

२३. रेल्वे, जमिनी, रस्ते व दळणवळणाच्या यंत्रणा पाण्याखाली जाऊन उद्भवणारी संभाव्य गैरसोय कमी करण्याच्या हेतूने महामंडळ, राज्य शासन, रेल्वे प्राधिकरणे, स्थानिक प्राधिकरणे आणि सांविधिक मंडळ यांच्याशी समन्वय ठेवील आणि अशा तऱ्हेने या गोष्टी पाण्याखाली जाण्यामुळे ज्या कोणत्याही लोकवस्तीची पुनर्रचना किंवा पुनर्वसाहत करणे आवश्यक आहे त्या लोकवस्तीची पुनर्रचना किंवा पुनर्वसाहत करून देण्याचा खर्च सोसील.

रेल्वे, जमिनी, रस्ते, दळणवळणाच्या यंत्रणा, पाण्याखाली जाण्यामुळे उद्भवलेली गैरसोय कमी करण्याकरिता इतर प्राधिकरणांशी समन्वय.

१९७६ चा महा. ३८.

२४. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ आणि मुंबई कालवे नियम, १९३४ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त अधिनियम आणि नियम यांच्या तरतुदींनुसार, महामंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये,—

(अ) महामंडळ, राज्य शासनाची किंवा समुचित प्राधिकरणाची सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडील किंवा त्यांच्या अधिकारांचा वापर करील ; आणि

(ब) यासंबंधात महामंडळाने प्राधिकृत केलेला महामंडळाचा कोणताही अधिकारी कालवे अधिकाऱ्याची सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडील आणि सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करील.

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ अन्वये महामंडळाने वापरावयाचे अधिकार.

२५. या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासन, त्यास आवश्यक व इष्ट वाटेल असे धोरणविषयक किंवा महामंडळाच्या अधिकारांचा वापर व महामंडळाने पार पाडावयाची कामे यासंबंधी महामंडळाने आकारावयाची व वसूल करावयाची पाणीपट्टी सोडून महामंडळास सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देईल, आणि अशा निदेशांचे पालन करणे व त्यानुसार कृती करणे हे महामंडळावर बंधनकारक राहील.

निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

प्रकरण पाच

भूमि संपादन

या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी भूमिसंपादन करण्याचे अधिकार. २६. राज्य शासन या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी भूमिसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये सक्तीने भूमिसंपादन करील आणि कोणत्याही उक्त प्रयोजनांसाठी संपादन करण्यात आलेली कोणतीही जमीन, त्या अधिनियमाच्या अर्थांतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ संपादन करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. १८९४ चा

शासनाच्या जमिनीचे महामंडळाकडे हस्तांतरण. २७. या अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुरःसरणार्थ राज्य शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, शासन व महामंडळ यांमध्ये मान्य करण्यात येतील अशा शर्तीवर, राज्य शासनाकडे निहित असतील अशा कोणत्याही जमिनी महामंडळाच्या स्वाधीन करता येतील :

परंतु, राज्य शासन, अधिसूचित करण्यात आलेल्या आणि राखीव वनांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही जमिनी महामंडळाकडे सुपूर्द करणार नाही.

(२) अशा प्रकारे कोणतीही जमीन महामंडळाकडे सोपविण्यात आल्यानंतर, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा विनियम याच्या तरतुदींनुसार आणि त्यासंबंधात राज्य शासनाकडून कोणतेही निदेश दिले गेले असतील तर निदेशांनुसार महामंडळाकडून तिच्या-बाबत कार्यवाही केली जाईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये महामंडळाच्या स्वाधीन असलेल्या कोणत्याही जमिनीची महा-मंडळास आवश्यकता नसेल तर राज्य शासन महामंडळाला, परस्परात मान्य होतील अशा अटींवर व शर्तीवर ती जमीन परत करायला सांगू शकेल.

जमीन इत्यादी निकालात काढण्याचे महामंडळाचे अधिकार. २८. या अधिनियमाखाली राज्य शासनाने तयार केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीन राहून, महामंडळ या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा रीतीने, महा-मंडळाकडे निहित असलेली कोणतीही जमीन, कोणतीही इमारत किंवा इतर मालमत्ता भाडेतत्त्वावर देईल, विकील, अदलाबदल करील किंवा ती अन्य प्रकारे निकालात काढील.

प्रकरण सहा

वित्त व्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा

महामंडळाच्या मत्ता, इत्यादींचा विनियोग. २९. महामंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी आणि इतर मत्ता, महामंडळाकडून या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी धारण केली जाईल आणि तिचा विनियोग केला जाईल.

महामंडळाचा निधी. ३०. (१) महामंडळाकडे आपला स्वतःचा निधी असेल व ते त्याचे परिरक्षण करील. त्या निधीत,—

(अ) अनुदान, अर्थसहाय्य, कर्जे, आगाऊ रकमा याद्वारे राज्य शासनाकडून किंवा अन्यथा मिळालेल्या आणि या अधिनियमाखाली उभारलेल्या कर्जातून महामंडळास प्राप्त झालेल्या सर्व रकमा;

(ब) या अधिनियमाखाली महामंडळास प्राप्त झालेली सर्व फी, खर्च आणि आकार;

(क) जमिनी, इमारती आणि अन्य स्थावर व जंगम मालमत्ता यांच्या विल्हेवाटीद्वारे आणि इतर व्यवहारांद्वारे महामंडळास प्राप्त झालेल्या सर्व रकमा;

(ड) महामंडळास, पाणीपट्टी, भाडे आणि नफा म्हणून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या सर्व रकमा,

जमा करण्यात येतील.

(२) महामंडळाला, स्टेट बँकेमध्ये किंवा राज्य शासनाने या बाबतीत मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही बँकेमध्ये चालू किंवा ठेव खात्यात निधी ठेवता येईल.

(३) या बाबतीत महामंडळाकडून प्राधिकृत करता येईल अशा अधिकाऱ्यांना अशा खात्यातील पैशांचा व्यवहार करता येईल.

(४) पोट-कलमे (२) व (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महामंडळास, आपल्या दैनंदिन व्यवहारासाठी, विहित करण्यात येईल अशा मर्यादेस आणि शर्तीस अधीन राहून त्यास योग्य वाटेल एवढी रक्कम हाती ठेवता येईल.

**महामंडळाच्या निधीत शासनाचे अंशदान.**

३१. (१) राज्य शासन, यासंबंधात वेळोवेळी यथोचितरीत्या करावयाच्या विनियोजनान्वये, या अधिनियमाखालील महामंडळाची कामे पार पाडण्यासाठी महामंडळाला आवश्यक असलेल्या भांडवलातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणून, महामंडळाच्या निधीमध्ये रुपये १४०० कोटींपेक्षा कमी होणार नाही एवढ्या एकूण रकमेची तरतूद करील आणि असे अंशदान महामंडळाच्या स्थापनेच्या तारखेपासून दहा वर्षांच्या कालावधीमध्ये विभागून योग्य हप्त्यांमध्ये करण्यात येईल :

परंतु असे की, राज्य शासन यासंबंधात योग्यरीत्या करावयाच्या विनियोजनाद्वारे महामंडळाच्या निधीमध्ये प्रारंभी अंशदान करून रुपये १०० कोटी एवढी रक्कम भरील :

परंतु आणखी असे की, शासनाकडून करण्यात येणारे उपरोक्त अंशदान, महामंडळाच्या स्थापनेकरिता आणि स्थापनेच्या संबंधात शासनाकडून करण्यात आलेला खर्च वगळता असेल.

(२) राज्य शासनाकडून तरतूद करण्यात आलेल्या भांडवलावर कोणतेही व्याज असणार नाही.

**महामंडळाला अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे आणि आगाऊ रकमा देणे.**

३२. राज्य शासनाला राज्य विधानमंडळाने या बाबतीतील, कायद्याद्वारे यथोचित विनियोजन केल्यानंतर, या अधिनियमाखालील महामंडळाची कामे पार पाडण्यासाठी शासनाला आवश्यक वाटतील अशी अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे आणि आगाऊ रकमा महामंडळाला देता येतील आणि देण्यात आलेली सर्व अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे आणि आगाऊ रकमा, या राज्य शासन निर्धारित करील अशा अटींवर व शर्तींवर देण्यात येतील.

**महामंडळाचा कर्ज घेण्याचा अधिकार.**

३३. (१) महामंडळाला स्वतःसाठी पुरेशा साधनसंपत्तीची तरतूद करण्याच्या प्रयोजनासाठी त्याला या बाबतीत विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, वित्तीय संस्थांकडून किंवा अनिवासी भारतीयांकडून किंवा खुल्या बाजारातून किंवा हमी घेतलेली किंवा हमी न दिलेली बंधपत्रे, ऋणपत्रे, रोखे किंवा अन्य प्रकारे पैसे कर्जाऊ घेता येतील.

(२) राज्य शासनाने, या प्रयोजनासाठी उच्चस्तर कमाल रक्कम निश्चित केली नसेल तर, महामंडळाला कोणत्याही वेळी, पोट-कलम (१) अन्वये रुपये एक हजार कोटी इतकी कमाल रक्कम कर्जाऊ घेता येईल.

**महामंडळाने ठेवी स्वीकारणे.**

३४. या अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुष्टचर्थ ज्यांना जमीन किंवा इमारती नेमून देण्यात किंवा विकण्यात आल्या आहेत किंवा नेमून देण्याची किंवा विकण्याची शक्यता आहे किंवा मच्छीमारीचे किंवा अन्य काही हक्क देण्यात आले आहेत अशा व्यक्ती, प्राधिकरणे किंवा संस्था यांच्याकडून महामंडळाला योग्य वाटतील अशा शर्तींवर ठेवी स्वीकारता येतील.

खर्च करण्याचा सर्वसाधारण अधिकार. ३५. महामंडळाला यथास्थिति, कलम ३० मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या महामंडळाच्या सर्वसाधारण निधीमधून किंवा कलम ३८ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या राखीव आणि इतर निधींमधून या अधिनियमाखाली प्राधिकृत करण्यात आलेल्या प्रयोजनांसाठी त्याला योग्य वाटतील अशा रकमा खर्च करण्याचा प्राधिकार असेल.

पाटबंधारे आणि जलविद्युत प्रकल्प यांखेरीज अन्य उद्दिष्टांवरील खर्च. ३६. महामंडळ, पाटबंधारे तसेच जलविद्युत प्रकल्प यांखेरीज या अधिनियमान्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या उद्दिष्टांवर त्याला योग्य वाटेल, अशी रक्कम खर्च करण्यास सक्षम असेल आणि अशी रक्कम, या अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये वाटप करण्यापूर्वी महामंडळाच्या निधीतून देण्यात येणारा सामान्य खर्च म्हणून मानण्यात येईल.

मुख्य उद्दिष्टांसाठी प्रकल्पांवर आकारावयाच्या खर्चाचे नियत वाटप. ३७. प्रकल्पांवर आकारण्याजोगा एकूण भांडवली खर्च, दोन मुख्य उद्दिष्टांमध्ये म्हणजेच पाटबंधारे प्रकल्प आणि जलविद्युत ऊर्जा प्रकल्प यांमध्ये पुढीलप्रमाणे वाटण्यात येईल :—

(अ) उक्त दोन उद्दिष्टांपैकी केवळ कोणत्याही एकाच उद्दिष्टाला लागू असणारा खर्च त्या उद्दिष्टांवर वरकड आणि सर्वसाधारण खर्चाच्या प्रमाणशीर हिश्श्यासह आकारण्यात येईल; आणि

(ब) वरकड आणि सर्वसाधारण खर्चाचा प्रमाणानुसार हिस्सा धरून उक्त दोन्ही उद्दिष्टांचा सामाईक खर्च महामंडळांच्या अंदाजानुसार, खंड (अ) अन्वये त्या उद्दिष्टांसाठी निश्चित केलेली रक्कम वजा जाता, उक्त उद्दिष्टासाठी स्वतंत्रपणे बांधकाम केले असते तर जो खर्च झाला असता त्या खर्चाच्या प्रमाणात वाटून दिला जाईल.

राखीव व इतर निधी. ३८. (१) महामंडळ, राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा राखीव आणि इतर विशेष-रीत्या अभिधान देण्यात आलेल्या निधीसाठी तरतूद करील.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या निधीची व्यवस्था, वेळोवेळी निधीच्या खाली हस्तांतरित करावयाची रक्कम आणि त्यामध्ये समाविष्ट असलेल्या पैशांचे विनियोजन महामंडळाकडून, त्या बाबतीत राज्य शासनाने कोणतेही निदेश दिलेले असल्यास त्यांच्या अधीन राहून, निर्धारित करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले कोणतेही निधी, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय, ते ज्या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आले असतील त्याखेरीज इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणार नाहीत.

महामंडळाला अर्थसंकल्प सादर करणे. ३९. (१) महामंडळाचा कार्यकारी संचालक, प्रत्येक वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यामध्ये घेण्यात यावयाच्या विशेष बैठकीत महामंडळाचा पुढील वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज महामंडळापुढे ठेवील.

(२) असा प्रत्येक अर्थसंकल्पीय अंदाज राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे, निर्धारित करील अशा नमुन्यांमध्ये तयार करण्यात येईल आणि त्यामध्ये,—

(एक) पुढील वर्षात ज्यांची अंमलबजावणी महामंडळाला करावयाची आहे असे प्रस्ताव, योजना आणि प्रकल्प यांसाठी;

(दोन) महामंडळाच्या सर्व दायित्वांची योग्य प्रकारे परिपूर्ती करण्यासाठी; आणि

(तीन) या अधिनियमाच्या तरतुदींचे कार्यान्वयन करण्यासाठी,

तरतूद करण्यात आलेली असेल ; आणि अशा अंदाजामध्ये, पुढील वर्षाच्या भांडवली व महसुली लेख्यांवरील अंदाजित उत्पन्न व खर्च दाखविणारे विवरणपत्र आणि राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे महामंडळाचे वित्तीय कार्य दर्शविणारा इतर तपशील अंतर्भूत असेल. अर्थसंकल्प वित्तीय खर्च व केलेले काम यासंबंधीचे स्पष्ट चित्र उभे करील.

४०. कलम ३९ अन्वये सादर करण्यात आलेला अर्थसंकल्पीय अंदाज महामंडळ विचारात घेईल, आणि राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी फेरफारांसह किंवा फरफारांशिवाय तो मान्य करील.

**अर्थसंकल्पीय अंदाजास मंजुरी देणे.**

४१. राज्य शासन, महामंडळाला दिलेल्या किंवा महामंडळाकडे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही कर्जाची परतफेड करण्यास किंवा सर्व किंवा कोणत्याही कर्जावरील व्याजाचे प्रदान करण्यास हमी-दार राहू शकेल.

**शासन हमीदार म्हणून असणे.**

४२. (१) या अधिनियमाच्या कलम ४४, पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, प्रत्येक मुख्य उद्दिष्टांमुळे म्हणजेच, पाटबंधारे व वीज यांमुळे कोणताही निव्वळ नफा मिळत असेल तर तो पूर्णपणे महामंडळाकडे जमा करण्यात येईल.

(२) कोणत्याही उद्दिष्टांमुळे कोणताही निव्वळ तोटा येत असेल तर तो केवळ राज्य शासना-कडून सोसला जाईल.

**नफा आणि तोटयाची विल्हेवाट लावणे.**

४३. महामंडळाला जर तोटा आला असेल तर भांडवली खर्चात व्याज आकार आणि इतर खर्च मिळवण्यात येईल आणि सर्व जमा रकमा अशा भांडवली खर्चातून वजा करण्यासाठी असल्याचे समजण्यात येईल.

**भांडवली खर्चात व्याज आकार आणि इतर खर्च मिळवणे आणि जमा रकमा वजा करणे.**

४४. (१) महामंडळास, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दराने व अशा अटींवर राज्य शासनाशी विचारविनिमय करून घसारा निधीसाठी तरतूद करता येईल.

(२) अशी तरतूद करण्यात आल्यानंतर, कलम ४२ च्या प्रयोजनार्थ निव्वळ नफा निश्चित करण्यात येईल.

**घसारा निधी.**

४५. राज्य शासनाकडून कोणतही सुधार आकार लादण्यात आला असेल तेव्हा त्या सुधार आकाराचा महामंडळाच्या कार्याशी जेथवर संबंध येतो तेथवर त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा महामंडळाकडे जमा खाती टाकण्यात येईल.

**राज्य शासना-कडून लादण्यात आलेल्या सुधार आकारचे संविभाजन.**

४६. (१) महामंडळ, प्रत्येक वित्तीय वर्षी विहित करण्यात येईल अशा तारखेपर्यंत, पुढील वित्तीय वर्षाचे वार्षिक वित्तीय निवेदन आणि कामांचा कार्यक्रम तयार करील आणि मान्यतेसाठी राज्य शासनाकडे सादर करील, आणि राज्य शासनाला, महामंडळाच्या अशा वित्तीय निवेदनाला व कार्यक्रमाला, महामंडळाने ते सादर केले असतील तशा स्वरूपात किंवा त्यात राज्य शासनाला योग्य वाटतील असे फेरफार करून मान्यता देता येईल.

(२) वार्षिक वित्तीय निवेदनात, पुढील वित्तीय वर्षातील अंदाजित जमा आणि खर्चाच्या रकमा विहित करण्यात येतील अशा स्वरूपात आणि तशा तपशिलासह दर्शविण्यात येतील.

**वित्तीय निवेदन आणि कार्यक्रम.**

(३) त्या वित्तीय वर्षामध्ये मान्य केलेल्या कार्यक्रमामध्ये फेरफार करण्यास महामंडळ सक्षम असेल, मात्र, मंजूर अर्थसंकल्पामध्ये केलेले असे सर्व फेरफार आणि पुनर्विनियोजने पुरवणी वित्तीय निवेदनाद्वारे राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्यात येतील.

(४) वार्षिक वित्तीय निवेदन आणि कार्यक्रम आणि कोणतेही पूरक वित्तीय निवेदन असेल तर ते निवेदन त्यांची प्रत्येकी एक प्रत राज्य शासनाला मिळाल्यानंतर राज्य शासनाद्वारे शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्यात येईल.

लेखे व लेखा परीक्षा. ४७. (१) महामंडळ, धंदा आणि देवघेव यासंबंधातील लेखा पुस्तके आणि इतर पुस्तके विहित करण्यात येतील अशा नमुन्यात आणि अशा रीतीने ठेवील.

(२) महामंडळाच्या लेख्यांची लेखा परीक्षा राज्य शासनाने भारताचे नियंत्रक आणि महालेखा-परीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून नियुक्त केलेल्या लेखा परीक्षकांकडून करण्यात येईल.

(३) वित्तीय वर्ष संपल्यापासून नऊ महिन्यांच्या आत महामंडळ लेखा परीक्षा केलेल्या लेख्यांची एक प्रत, त्यावरील लेखा परीक्षकांच्या अहवालाच्या प्रतीसह राज्य शासनाकडे पाठवील.

(४) पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाकडे अग्रेषित केलेले महामंडळाचे लेखे, त्यावरील लेखा परीक्षा अहवालासह शक्यतोवर, लेखे व अहवाल ज्या वर्षाशी संबंधित असतील त्या वर्षाच्या लगतनंतरचे वर्ष समाप्त होण्यापूर्वी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची, राज्य शासन व्यवस्था करील.

समवर्ती आणि विशेष लेखा परीक्षा. ४८. (१) लगतपूर्वीच्या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून महामंडळाच्या लेख्यांच्या समवर्ती लेखा परीक्षेचे आदेश राज्य शासनाला देता येतील. तसेच कोणत्याही विशिष्ट व्यवहाराच्या किंवा व्यवहाराच्या वर्गाच्या किंवा मालिकेच्या आणि एखाद्या विशिष्ट कालावधीच्या संबंधातील महामंडळाच्या लेख्याची राज्य शासनाला योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून विशेष लेखापरीक्षा करून घेण्याचा निदेश, राज्य शासनाला देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश काढण्यात आला असेल अशा वेळी, महामंडळ असे सर्व लेखे, लेखा परीक्षेसाठी हजर करील किंवा हजर करण्याची व्यवस्था करील आणि पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या व्यक्तीला लेखा परीक्षेच्या प्रयोजनासाठी आवश्यक अशी माहिती पुरवील.

## प्रकरण सात

## संकीर्ण व पूरक तरतुदी

वार्षिक अहवाल व विवरणे, इत्यादी सादर करणे. ४९. (१) महामंडळ, प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत त्याच्या मागील वित्तीय वर्षातील कामाचा वार्षिक अहवाल विशेषत: पुढील बाबींच्या संदर्भात विहित नमुन्यात तयार करील, आणि राज्य शासनास सादर करील,—

(अ) पाटबंधारे, लाभक्षेत्र विकास आणि पूर नियंत्रण;
(ब) पाणीपुरवठा;
(क) जलविद्युत ऊर्जा;
(ड) मनोरंजनाच्या सुविधा;
(ई) जमिनींचा वापर;
(फ) विस्थापित व्यक्तींची पुनर्वसाहत; आणि
(ग) महामंडळाचे इतर कार्यक्रम.

(२) महामंडळ, राज्य शासन वेळोवेळी मागणी करील त्याप्रमाणे, त्याचे कामकाज, मालमत्ता अथवा कामे किंवा कोणतेही प्रस्तावित काम किंवा योजना यांसंबंधातील विवरणपत्रे, आकडेवारी, अहवाल, लेखे आणि इतर माहितीसुद्धा राज्य शासनाला पुरवील.

**प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन व पुनर्वसाहत.**

१९८९ चा महा. ३३. ५०. पाटबंधारे आणि जलविद्युत प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे काम, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ च्या तरतुदींनुसार राज्य शासनाद्वारे पार पाडण्यात येईल :

परंतु असे की, प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन किंवा पुनर्वसाहत यासाठी राज्य शासनाने करणे आवश्यक असणारा सर्व खर्च महामंडळ सोशील.

**करार करणे, इत्यादी.**

५१. महामंडळाच्या वतीने करण्यात आलेल्या मालमत्तेचा प्रत्येक करार व हस्तांतरण पत्र हे लेखी स्वरुपात असेल आणि विनियमांमध्ये तरतूद करण्यात येईल असा प्राधिकारी किंवा अधिकारी यांच्याद्वारे व अशा रीतीने ते करण्यात येईल.

**सर्वसाधारण शास्ती.**

५२. जो कोणी हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा विनियम यांच्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा या अधिनियमान्वये काढलेल्या कोणत्याही नोटिशीचे, आदेशाचे किंवा आवश्यक बाबींचे अनुपालन करणार नाही त्याला दोषसिद्धीनंतर, सहा महिने मुदतीच्या कारावासाची अथवा एक हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची अथवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

**प्रवेश करण्याचा अधिकार.**

५३. महामंडळाने सर्वसाधारणपणे किंवा विशेषरीत्या प्राधिकृत केलेला महामंडळाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना सर्व योग्यवेळी कोणत्याही जमिनीवर किंवा जागेत प्रवेश करता येईल, आणि महामंडळाला कायदेशीरपणे त्याचे कोणतेही काम पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा या अधिनियमान्वये महामंडळाच्या अधिकारांचा वापर करताना किंवा त्याची कामे पार पाडताना करावयाच्या प्राथमिक किंवा आनुषंगिक अशा कोणत्याही सर्वेक्षणाच्या, तपासणीच्या, किंवा अन्वेक्षणाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी करता येतील.

**येणे रकमा जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करणे.**

५४. हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा विनियम या अन्वये कोणताही आकार, मूल्य, खर्च, शुल्क, भाडे, भरपाई यांच्यापोटी किंवा अन्य कोणत्याही कारणापोटी अथवा महामंडळाशी केलेल्या कोणत्याही करारापोटी कोणत्याही व्यक्तीकडून महामंडळाला येणे असलेल्या किंवा मंडळातर्फे वसुलीयोग्य असलेल्या सर्व रकमा आणि त्यासंबंधात भरलेला सर्व आकार किंवा केलेला सर्व खर्च वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीस बाध न आणता महामंडळाने अर्ज केल्यानंतर जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

**नोटिसा इत्यादी बजावणे.**

५५. (१) कोणत्याही व्यक्तीवर या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा विनियम याद्वारे बजावणे आवश्यक असतील अशा सर्व नोटिसा, आदेश व इतर दस्तऐवज हे या अधिनियमात किंवा अशा नियमात किंवा विनियमात अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरून पुढील बाबतीत रीतसर बजावण्यात आले असल्याचे समजण्यात येईल :—

१९५६ चा १ (अ) जिच्यावर नोटीस, इत्यादी बजावावयाची ती व्यक्ती कंपनी असेल त्याबाबतीत कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ५१ च्या तरतुदींनुसार ती बजावण्यात आली असेल ;

(ब) जिच्यावर नोटीस इत्यादी बजावावयाची ती व्यक्ती भागीदारी संस्था असेल त्याबाबतीत जर तो दस्तऐवज, भागीदारी संस्थेच्या धंद्याच्या मुख्य ठिकाणी, संस्था ज्या नावाने व पद्धतीने धंदा करीत असेल त्या नावाने व पद्धतीने तिचा निर्देश करून पाठविला असेल आणि तो एकतर,—

(एक) टपाल दाखला घेऊन किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविला असेल, किंवा

(दोन) धंद्याच्या उक्त ठिकाणी देण्यात आला असेल ;

(क) जिच्यावर नोटीस इत्यादी बजावावयाची ती व्यक्ती सांविधिक सार्वजनिक निकाय किंवा महामंडळ किंवा संस्था किंवा अन्य निकाय असेल त्याबाबतीत, जर तो दस्तऐवज, त्या निकायाच्या,

महामंडळाच्या किंवा संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे तिच्या सचिवाच्या, कोषाध्यक्षाच्या किंवा इतर प्रमुख अधिकाऱ्याच्या नावे पाठविला असेल ; आणि तो एकतर,—

(एक) टपाल दाखला घेऊन किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविला असेल, किंवा

(दोन) त्या कार्यालयात देण्यात आला असेल ;

(ड) इतर कोणत्याही बाबतीत, जर, तो दस्तऐवज जिच्यावर बजावावयाचा त्या व्यक्तीच्या नावे असेल आणि तो,—

(एक) तिला दिला किंवा देऊ केला असेल ; किंवा

(दोन) अशी व्यक्ती सापडणे शक्य नसेल तेव्हा तिच्या राहण्याचे किंवा धंद्याचे शेवटचे माहीत असलेले जे ठिकाण असेल त्या ठिकाणी ठळक जागी लावला असेल किंवा तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीला दिला किंवा देऊ केला असेल किंवा असा दस्तऐवज जिच्याशी संबंधित असेल त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या एखाद्या ठळक भागावर लावण्यात आला असेल ; किंवा

(तीन) त्या व्यक्तीला टपाल दाखला घेऊन किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविला असेल.

(२) कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर बजावणे आवश्यक किंवा प्राधिकृत करण्यात आले असेल असा कोणताही दस्तऐवज हा, नाव व वर्णन यांसह त्या जमिनीचा किंवा इमारतीचा (त्या जमिनीचे किंवा इमारतीचे नाव नमूद करून), यथास्थिति, 'मालक' किंवा 'भोगवटादार' असे संबोधून पाठविता येईल आणि,—

(अ) अशा रीतीने संबोधित केलेला तो दस्तऐवज पोट-कलम (१), खंड (ड) अनुसार पाठविण्यात किंवा देण्यात आला असेल ; किंवा

(ब) अशा रीतीने संबोधित केलेला दस्तऐवज किंवा अशा रीतीने संबंधित केलेली त्याची प्रत त्या जमिनीवरील किंवा इमारतीमधील एखाद्या व्यक्तीला देण्यात किंवा देऊ करण्यात आली असेल किंवा त्या जमिनीवर किंवा इमारतीमध्ये ती देण्यासाठी कोणतीही व्यक्ती नसेल त्याबाबतीत तो दस्तऐवज त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या एखाद्या ठळक जागी लावण्यात आला असेल तर,—

तो रीतसर बजावण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(३) या कलमानुसार भागीदारी संस्थेवर दस्तऐवज बजावण्यात आला असेल त्याबाबतीत तो दस्तऐवज प्रत्येक भागीदारावर बजावण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(४) कोणत्याही मालमत्तेच्या मालकावर कोणताही दस्तऐवज बजावणे शक्य व्हावे यासाठी, राज्य शासन किंवा यथास्थिति, महामंडळ यांना लेखी नोटिशीद्वारे त्या मालमत्तेच्या भोगवटादारास (कोणताही असल्यास) मालमत्तेच्या मालकाचे नाव व पत्ता नमूद करण्यास फर्मावता येईल.

**सार्वजनिक नोटीस कशी द्यावयाची आणि जाहीर करावयाची.**

५६. हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा विनियम या अन्वये द्यावयाची प्रत्येक सार्वजनिक नोटीस ही, लेखी व संबंधित अधिकाऱ्याच्या सहीने दिलेली असेल आणि तीचा परिणाम होणाऱ्या वस्तीत किंवा कृषि क्षेत्रात किंवा इस्टेटीमध्ये ठळक सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येईल किंवा दवंडी पिटवून जाहीर करण्यात येईल आणि अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने जाहीर करण्यात येईल.

**काम पार पाडण्यासाठी नोटिशीने मुदत देणे.**

५७. या अधिनियमान्वये अथवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम अथवा विनियम या अन्वये काढलेली अथवा दिलेली नोटीस, आदेश अथवा इतर दस्तऐवज या अनुसार करणे आवश्यक असलेली कोणतीही गोष्ट करण्याकरिता या अधिनियमात, नियमात अथवा विनियमात मुदत निश्चित करण्यात आली नसेल त्याबाबतीत, अशा नोटिशीत, आदेशात अथवा इतर दस्तऐवजात, ती गोष्ट करण्यास अथवा तिचे अनुपालन करण्यास वाजवी मुदत विनिर्दिष्ट करण्यात येईल.

**कर्तव्य पालनात कसूर.**

५८. (१) या अधिनियमाद्वारे लादण्यात आलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यात किंवा लादण्यात आलेले कोणतेही दायित्व पूर्ण करण्यात महामंडळाने कसूर केली आहे याबाबत राज्य शासनाची खात्री झाली तर, ते काम पार पाडण्यासाठी किंवा दायित्व पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाला मुदत निश्चित करता येईल आणि तदनुसार महामंडळाला नोटीस देण्यात येईल.

(२) अशा प्रकारे निश्चित केलेल्या मुदतीत असे काम पार पाडण्याच्या बाबतीत किंवा अशा दायित्वाची पूर्तता करण्याच्या बाबतीत महामंडळाने कसूर केली किंवा दुर्लक्ष केले तर, राज्य शासनाने, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने महामंडळाचे अधिक्रमण करणे आणि त्याची पुनर्रचना करणे कायदेशीर असेल.

(३) महामंडळाचे अधिक्रमण केल्यानंतर आणि प्रकरण दोन मध्ये घालून दिलेल्या रीतीने त्याची पुनर्रचना करण्यात येईपर्यंत राज्य शासन अथवा या प्रयोजनास्तव राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमण्यात येईल असा एक किंवा अनेक अधिकारी अथवा अधिकारी मंडळ महामंडळाचे या अधिनियमाखालील अधिकार, कामे व कर्तव्ये पार पाडील.

(४) महामंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, अधिक्रमणाच्या मुदतीत, राज्य शासनाकडे निहित असेल.

**कंपन्यांनी केलेले अपराध.**

५९. (१) जर एखाद्या कंपनीने या अधिनियमाखाली अपराध केला असेल तर त्याबाबतीत अशी कंपनी, तसेच तो अपराध घडला त्यावेळी कंपनीचा प्रभारी असलेली व कंपनीचे कामकाज चालविण्यास जबाबदार असणारी प्रत्येक व्यक्ती त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल व तिच्याविरूद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने तो अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमातील तरतुदीमुळे अशी कोणतीही व्यक्ती शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केले असले तरी, या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला व तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यात येईल व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांकरिता,—

(अ) "कंपनी" म्हणजे निगमनिकाय व त्यात भागीदारी संस्थेचा, व्यक्तींच्या संघाचा अथवा व्यक्तींच्या संस्थेचा-मग ती विधिसंस्थापित असो वा नसो-समावेश होतो, आणि

(ब) भागीदारी संस्थेच्या संदर्भात "संचालक" म्हणजे त्या भागीदारी संस्थेतील भागीदार आणि व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींची संस्था यांच्या संदर्भात संचालक म्हणजे, तिच्या कामकाजाचे नियंत्रण करणारा कोणताही सदस्य.

**खटला भरण्याचा प्राधिकार.**

६०. अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल तर, महामंडळाकडून किंवा महामंडळाने याबाबत सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून तक्रार करण्यात आल्या-खेरीज किंवा त्यांच्याकडून माहिती मिळाल्याखेरीज कोणत्याही न्यायालयाने महामंडळाच्या मालकीच्या किंवा या अधिनियमान्वये किंवा तदनुसार महामंडळाकडे निहित असलेल्या मालमत्तेच्या संबंधात या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

**अपराधांबाबत तडजोड करणे.**

६१. (१) महामंडळाला किंवा महामंडळाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे महामंडळाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये शिक्षेस पात्र ठरविण्यात आलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत कार्यवाही सुरू होण्यापूर्वी किंवा त्यानंतर, तडजोड करता येईल :—

(२) अपराधाच्या बाबतीत तडजोड करण्यात आली असेल त्याबाबतीत अपराध्यास, तो अभिरक्षेत असेल तर सोडून देण्यात येईल आणि तडजोड केलेल्या अपराधाच्या बाबतीत त्याविरुद्ध पुढे कोणतीही कार्यवाही चालविण्यात येणार नाही.

अडथळा आणल्याबद्दल शास्ती. ६२. कलम ५३ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीस कोणत्याही जागेत किंवा इमारतीत प्रवेश करण्यास अडथळा आणणाऱ्या किंवा असा प्रवेश केल्यानंतर अशा व्यक्तीस त्रास देणाऱ्या किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तिला देण्यात आलेले कोणतेही अधिकार वैधरीत्या वापरण्यात अडथळा आणणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अपराधसिद्धीनंतर सहा महिने मुदतीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपये दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

महामंडळाचे अधिकार सोपवणे. ६३. महामंडळास राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, या अधिनियमाखालील आपले कोणतेही अधिकार राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे किंवा आपल्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे सोपविता येतील आणि याबाबत काढलेल्या सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट अधिकार, आपल्या दुय्यम अधिकाऱ्याकडे आणखी प्रदान करण्यास त्याला परवानगी देण्यात येईल.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांना संरक्षण. ६४. हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा विनियम या अन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी संचालक, सदस्य व अधिकारी इत्यादी लोकसेवक असणे. ६५. हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम किंवा विनियमांच्या कोणत्याही तरतुदीस अनुसरून कृती करणारे अथवा ती करीत असल्याचे अभिप्रेत असलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, व्यवस्थापकीय संचालक, कार्यकारी संचालक आणि यथास्थिति, प्रतिनियुक्तीवरील किंवा महामंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

इतर कायद्यांशी विसंगत अधिनियमाच्या तरतुदी परिणामक्षम असणे. ६६. या अधिनियमाच्या तरतुदी त्यांच्याशी विसंगत असे काहीही कोणत्याही अन्य कायद्यात अंतर्भूत असले तरी परिणामक्षम असतील.

नियम करण्याचा अधिकार. ६७. (१) राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. १९७ चा हा. अध्या. ८.

(२) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन असतील.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या

प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्यात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, तर असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून, तो नियम केवळ अशा सुधारित स्वरुपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति अंमलात येणार नाही. तथापि, अशी कोणतीही सुधारणा किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये त्यापूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**विनियम करण्याचा अधिकार.**

६८. (१) महामंडळास राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने या अधिनियमान्वये विनियमांद्वारे तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी आणि सर्वसाधारणपणे, महामंडळाच्या मते या अधिनियमान्वये त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी तरतूद करणे आवश्यक असेल अशा अन्य सर्व बाबींसाठी हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्याशी सुसंगत असे विनियम करता येतील.

(२) राज्य शासनाच्या मान्यतेने महामंडळाकडून विनियम तयार करण्यात येईतोपर्यंत, महामंडळ आपली कामे पार पाडण्याकरिता पाटबंधारे विभागाकडून अनुसरण्यात येणारे नियम व कार्यपद्धतींचे योग्य त्या फेरफारांसह अनुसरण करील.

**शंका आणि अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

६९. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही शंका किंवा अडचण उपस्थित झाली तर, राज्य शासनास आदेशाद्वारे, ती शंका किंवा अडचण दूर करण्याच्या दृष्टीने त्यास आवश्यक व इष्ट वाटत असेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणारी तरतूद करता येईल किंवा असा निदेश देता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा आदेश देता येणार नाही.

**महामंडळ विसर्जित करणे.**

७०. (१) या अधिनियमान्वये ज्या प्रयोजनांसाठी हे महामंडळ स्थापन करण्यात आले आहे ती प्रयोजने मोठ्या प्रमाणात साध्य झाली आहेत याबद्दल राज्य शासनाची खात्री झाली व त्यामुळे हे महामंडळ चालू ठेवणे अनावश्यक आहे, असे शासनाचे मत झाले तर शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून महामंडळ विसर्जित झाल्याचे घोषित करता येईल व तदनुसार महामंडळ विसर्जित झाल्याचे समजण्यात येईल आणि अशा विसर्जनानंतर सदस्य, (अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष असल्यास त्यांच्यासह) आपापली पदे सोडून देतील.

(२) उक्त तारखेपासून,—

(अ) महामंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी किंवा त्याने वसुली करावयाच्या रकमा, राज्य शासनाकडे निहित होतील किंवा त्याने वसुली करण्याजोग्या ठरतील ;

(ब) महामंडळावर लादण्यायोग्य असलेली सर्व दायित्वे, राज्य शासनावर लादण्यायोग्य असतील.

**सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ याचे निरसन व व्यावृत्ती.**

७१. (१) महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अध्यादेश, १९९७ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (केलेली कोणतीही नियुक्ती किंवा केलेला कोणताही नियम, काढलेला आदेश किंवा अधिसूचना यांसह) ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये केलेली यथास्थिति, गोष्ट किंवा कृती असल्याचे मानण्यात येईल.

अनुसूची

[कलम १८ (म) पहा]

| अनुक्रमांक | उपसासिंचन योजनांची नावे | | तालुका | सिंचनयोग्य क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) |
| | भाग एक | | | |
| | जळगाव जिल्ह्यातील सहकारी उपसा सिंचन योजनांची सूची— | | | |
| १ | दुर्गा सहकारी पाटबंधारे योजना, सावदा, रावेर | .. | सावदा | ७६९ |
| २ | अमोदा सहकारी पाटबंधारे योजना, यावल | .. | यावल | १०१२ |
| ३ | महिसवाडी सहकारी पाटबंधारे योजना, महिसवाडी | .. | यावल | २८३ |
| ४ | दादासाहेब जिवराम महाजन उपसा, भालोद, तालुका यावल. | | यावल | १०१५ |
| ५ | न्हावी सहकारी पाटबंधारे योजना, न्हावी, तालुका यावल | | यावल | १२१० |
| ६ | दादासाहेब जे. टी. महाजन सहकारी पाटबंधारे योजना, किनगाव क्र. १, तालुका यावल. | | यावल | ८१० |
| ७ | दादासाहेब जे. टी. महाजन सहकारी पाटबंधारे योजना, किनगाव क्र. २, तालुका यावल. | | यावल | ८१० |
| ८ | निंभोरा सहकारी पाटबंधारे योजना, निंभोरा | .. | रावेर | ६८० |
| ९ | कोठूर सहकारी पाटबंधारे योजना कोठूर | .. | रावेर | ५७५ |
| १० | मधुकर चौधरी एल. आय. एस., मस्कावद | .. | रावेर | ३०० |
| ११ | सरदार वल्लभभाई पटेल, थोरगव्हाण | .. | रावेर | ६५० |
| १२ | नागेश्वर सहकारी पाटबंधारे योजना, जळोद | .. | अमळनेर | ५४० |
| १३ | सोमेश्वर सहकारी पाटबंधारे योजना, कलाली क्र. १ | .. | अमळनेर | २६० |
| १४ | सोमेश्वर सहकारी पाटबंधारे योजना, शहापूर | .. | अमळनेर | ८०२ |
| १५ | किसान सहकारी पाटबंधारे योजना, साक्री | .. | भुसावळ | ४३६ |
| १६ | मुक्ताई सहकारी पाटबंधारे योजना, मनुर-बुद्रुक | .. | भुसावळ | १६१८ |
| १७ | नीलकमल सहकारी पाटबंधारे योजना, देवगाव | .. | पारोळा | ६२१ |
| | | | | १२०३१ |
| | महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि आणि ग्रामविकास बँक मर्यादित, जळगाव. | | | |
| १८ | बामनोद सहकारी एल. आय. एस., बामनोद | .. | यावल | ८१० |
| १९ | प्रतिभा सहकारी एल. आय. एस., निमखेडी | .. | एदलाबाद | १६१५ |
| २० | सानेगुरुजी सहकारी एल. आय. एस., ओहारे | .. | अमळनेर | १०३० |
| २१ | कपिलेश्वर सहकारी एल. आय. एस., निंब | .. | अमळनेर | ५१५ |
| | | | | ३९७० |

| अनुक्रमांक | उपसा सिंचन योजनांची नावे | तालुका | सिंचनयोग्य क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | **भाग दोन** | | |
| | **धुळे जिल्ह्यातील सहकारी उपसा सिंचन योजनांची सूची–** | | |
| १ | उत्तर तापी, भिलाडी | शहादा | ३२४ |
| २ | कामेश्वर, भामखेडा | शहादा | ४०५ |
| ३ | श्रीदत्त, रंगखेडा | शहादा | ५६७ |
| ४ | केदावेश्वर प्रकाशा | शहादा | १२१५ |
| ५ | श्रीरामकृष्ण, कहाडळ | शहादा | ८१० |
| ६ | अक्कादसे, सोनेवाडी, नेवाडा | शिंदखेडा | ४०५ |
| ७ | श्रीविद्यासिनी, अक्कडसे मोठे धामणे | शिंदखेडा | १६१९ |
| ८ | देवकी-कंदन, शिरूड | शहादा | १२१५ |
| ९ | श्री रविकान्या, लोहगाव | शिंदखेडा | ४०५ |
| १० | श्री दाऊळ नंदने, दाऊळ | शिंदखेडा | ४८६ |
| ११ | आशापुरी, तापीमाओ, पाटण | शिंदखेडा | ४०५ |
| १२ | सौ. कमलताई, वरडेल | शिंदखेडा | ८१० |
| १३ | भद्रेश्वर, केसिट | नंदुरबार | ८१० |
| १४ | राधाकृष्ण, हटमोहिदा | नंदुरबार | ५०० |
| १५ | श्री सिद्धेश्वर, लवण शहादे | नंदुरबार | १२१५ |
| १६ | पेसे | शहादा | ४०० |
| १७ | कै. यशवंतराव चव्हाण, वरूड | शिंदखेडा | ४८१ |
| १८ | चामुंडेश्वरी देवी, तकरखेड | शिंदखेडा | ४०५ |
| १९ | जय योगेश्वरी, हिसपूर | शिंदखेडा | ४७० |
| २० | जयशंकर, लंघाणे | शिंदखेडा | ६७७ |
| २१ | साने गुरूजी, गवाणे | शिंदखेडा | ६०७ |
| २२ | स्वामी चक्रधर, गोराणे | शिंदखेडा | १७४१ |
| २३ | नागेश्वर नोलादेस्वल | शिंदखेडा | १४३४ |
| २४ | गुरूदत्त जिसेधा वदे | शिंदखेडा | १४९८ |
| २५ | भाग्यलक्ष्मी लंघाणे | शिंदखेडा | ३२४ |
| २६ | जय भवानी सिदखेड, निमगूळ | शिंदखेडा | ७६९ |
| २७ | शिंदखेडा दुग्ध उत्पादक कृषि पूरक सहकारी संस्था, दोंडायचा, तालुका खेड डौल, जय विठ्ठल, तालुका खेड | खेड डौल | १३३६ |
| २८ | कोलाडे | शिंदखेडा | ४०० |
| २९ | दीपक नाथ समशेरपूर | नंदुरबार | ४०५ |
| ३० | जनता, खोपर्ली | नंदुरबार | ६४० |
| ३१ | विश्वतीर्थ | नंदुरबार | २८० |
| ३२ | कर्मवीर, कोलाडे | नंदुरबार | १२२५ |
| ३३ | दिपिमाई, विखरण | नंदुरबार | ६०७ |
| ३४ | हरितक्रांती, पुसनाड | शहादा | ४०५ |
| ३५ | गायत्री, कळंबू | शहादा | ३६४ |
| | | | २५६६४ |